28-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/27/2025 10:07 PM Page 1



दवर्ली,नेसाय रेल्वे क्रॉसिंगवरील 'उड्डाणपूल' रेंगाळले पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



मुंबई इंडियन्सचा विजयाचा पंचकार पान ४ वर

वेर्णा, सोमवार, २८ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 235 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 28 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### अमृतसरमध्ये अवैध शस्त्रांसह तरुणाला अटक

**अमृतसर, दि. २७ :** काउंटर इंटेलिजेंस अमृतसरच्या पथकाने पाकिस्तानशी जोडलेल्या बेकायदेशीर शस्त्रास्त्र तस्करी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईदरम्यान, अमृतसर येथील रहिवासी अभिषेक कुमारला अटक करण्यात आली. त्याच्याकडून सात पिस्तूल (पाच .३० बोर पिस्तूल आणि दोन ग्लॉक ९ मिमी), चार जिवंत काडतुसे (.३० बोर) आणि १,५०,००० रुपये रोख जप्त करण्यात आले. ऑस्ट्रेलियात राहणारा नशा नावाचा एक माणूस पाकिस्तानातील तस्करांच्या संगनमताने भारत–पाकिस्तान सीमेवरून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याची तस्करी करत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

------------

### बीएसएफ जवान पाकिस्तानातच

**नवी दिल्ली, दि. २७ :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यातील भारत–पाकिस्तान सीमेवरून अटक करण्यात आलेला बीएसएफ जवान पीके साहू अजूनही पाकिस्तानी रेंजर्सच्या ताब्यात आहे. घटनेला चार दिवस उलटून गेले आहेत आणि तीन ध्वज बैठका झाल्या आहेत, परंतु सैनिकाची सुटका होऊ शकली नाही. यावर पाकिस्तानी रेंजर्स म्हणतात की, जोपर्यंत त्यांना हायकमांडकडून सूचना मिळत नाहीत तोपर्यंत ते सैनिकाला सोडू शकत नाहीत. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शुक्रवारी संध्याकाळी बीएसएफचे महासंचालक (डीजी) दलजित सिंग चौधरी यांनीही केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांच्याशी याबाबत चर्चा केली आणि उच्च पातळीवर हा मुद्दा उपस्थित केला.

# नौदलाचा अरबी समुद्रात युद्धसराव

## अनेक जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचा यशस्वी प्रयोग : लांब पल्ल्याची अचूक प्रहार क्षमता सिद्ध

नवी दिल्ली, दि. २७ :

**दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावात वाढ होण्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय नौदलाने अरबी समुद्रात अनेक जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचा यशस्वी प्रयोग केला आहे, ज्यामुळे त्यांची लांब पल्ल्याची अचूक प्रहार क्षमता सिद्ध झाली आहे.**

भारतीय नौदलाने कोलकाता–क्लास डिस्ट्रॉयर्स आणि नीलगिरी व क्रिवक–क्लास फ्रिगेट्ससह युद्धनौकांद्वारे ब्रह्मोस जहाजविरोधी आणि पृष्ठभागविरोधी क्रूझ क्षेपणास्त्रांची चाचणी केली आहे. या सरावाचा उद्देश नौदलाच्या ऑपरेशनल तयारीचे पुनर्मूल्यांकन करणे आणि समुद्रात अचूक हल्ला करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म, प्रणाली आणि क्रूची तयारी सुनिश्चित करणे होता.

नौदलाने ' एक्स ' ( ट्वीटर ) वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ' भारतीय नौदलाच्या जहाजांनी लांब पल्ल्याच्या अचूक प्रहारासाठी विविध जहाजविरोधी गोळीबार यशस्वीपणे पूर्ण केले. भारतीय नौदल कधीही, कुठेही आणि कोणत्याही परिस्थितीत देशाच्या सागरी हितांचे रक्षण करण्यासाठी सज्ज आहे.'

हे यशस्वी सराव पाकिस्तानने अरबी समुद्रात क्षेपणास्त्र हल्ल्यांबद्दल अधिसूचना जारी केल्यानंतर झाले,



ज्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी हालचालींवर चिंता व्यक्त केली गेली आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सागरी सामर्थ्याचे प्रदर्शन केले. या हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता आणि तो कलम ३७० रद्द केल्यानंतरचा सर्वात गंभीर हल्ला मानला जात आहे.

भारताने या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात कठोर राजनैतिक उपाययोजना केल्या असून, पाकिस्तानी नागरिकांना हद्दपार केले आणि सिंधू पाणी करार निलंबित केला आहे. यावर पाकिस्तानने भारतासोबतचे सर्व द्विपक्षीय करार निलंबित करून प्रत्युत्तर दिले आहे. नियंत्रण रेषेवर (एलओसी) वारंवार युद्धबंदीचे उल्लंघन होऊन तणाव आणखी वाढला आहे, पण भारतीय सैन्याने याचे प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले आहे. तथापि, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' रेडिओ प्रसारणात पहलगाम हल्ल्याचा निषेध करत म्हटले आहे की , दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्येक भारतीयाचे रक्त उकळत आहे. त्यांच्यापैकी प्रत्येकाला स्वतःचे नुकसान झालेल्यांचे दुःख जाणवत आहे. ते म्हणाले की , काश्मीरमध्ये शांतता परतत होती, पण देशाच्या आणि जम्मू–काश्मीरच्या शत्रूंना हे आवडले नाही.

दरम्यान आयएनएस सुरतने अलीकडेच अरबी समुद्रात स्किमिंग पान २ ▶

# पाकिस्तानींचा गोव्याला 'गुडबाय'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७ :** मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना राज्यात अल्पकालीन व्हिसावर राहणाऱ्या तीन पाकिस्तानी नागरिकांनी राज्य सरकारच्या आदेशानुसार गोवा सोडल्याची माहिती दिली. त्याआधारे, पोलिसांनी राज्यात अनधिकृतपणे राहणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई सुरू केली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री म्हणाले, दक्षिण आणि उत्तर गोवा जिल्ह्यांमधील स्थलांतरित कामगारांची पडताळणी पोलिसांनी सुरू केली आहे. आतापर्यंत २५०० ते ३००० लोकांची तपासणी करण्यात आली असून, काही व्यक्तींना ताब्यात घेतले आहे. काहींना तपासणी नंतर सोडण्यात आले आहे. ही

### ▶ कारवाई सुरूच राहणार : मुख्यमंत्री

प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरु आहे आणि रविवारी रात्रीउशिरा याबाबत अधिक माहिती मिळेल.

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, ज्यामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला, उत्तर आणि दक्षिण गोवा जिल्ह्यांतील पोलिस ठाण्यांनी कोम्बिंग ऑपरेशन आणि नाकाबंदीचे उपाय राबवले आहेत.

२५ एप्रिल रोजी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले होते की, राज्यात अल्पकालीन व्हिसावर असलेले तीन पाकिस्तानी नागरिक केंद्र सरकारने ठरवलेल्या अंतिम मुदतीनुसार राज्य सोडण्यास भाग पाडले जातील .

पान २ ▶

# वाहनाच्या धडकेत दुर्मिळ ब्लॅक पँथरचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २७ :** अज्ञात वाहनाच्या धडकेत दुर्मिळ ब्लॅक पँथरचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी पहाटे घडली . कोने – प्रियोळ येथील गार्डन हिल व्ह्यू रेस्टॉरंटजवळ फोंडा – पणजी महामार्गावर या ब्लॅक पँथरला वाहनाची धडक बसली असल्याची शक्यता वर्तवली जातेय . अपघातानंतर परिसरातील लोकांनी हा ब्लॅक पँथर पाहून आनंद व्यक्त केला, कारण हे प्राणी अत्यंत दुर्मिळ



आहेत. तथापि, काही तासांतच प्राण्याच्या मृत्यूची माहिती समोर आली आणि स्थानिकांना दु:ख आवरता आले नाही .

फोंडा वन विभागाने घटनास्थळी तातडीने पोहोचून जखमी ब्लॅक पँथरला बचावण्यासाठी प्रयत्न केले. प्रारंभिक तपासणीमध्ये वन अधिकाऱ्यांना समजले की पँथर गंभीर जखमी झाला आहे. रात्री १२:४५ वाजता स्थानिकांच्या मदतीने जखमी प्राण्याला जाळीने पकडून प्रथम उपचारासाठी पशुवैद्यकीय रुग्णालयात नेण्यात आले. त्याच्या गंभीर स्थितीमुळे त्याला मृत घोषित करण्यात आले.

पान २ ▶

# भारताने झेलम नदीत पाणी सोडले

### ▶ पाकव्याप्त काश्मीरमध्ये जलसंकट

**जम्मू, दि. २७ :** भारताने शनिवारी उरी धरणातून अचानकपणे पाणी सोडल्यामुळे पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मध्ये झेलम नदीच्या पाणीपातळीत अनपेक्षित वाढ झाली, परिणामी त्या भागात गोंधळ माजला. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते, यामुळे नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पाणी आणीबाणी निर्माण झाली आणि रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी



स्थलांतरित होण्याची आवश्यकता पडली.

भारताच्या या कृतीमुळे दोन अण्वस्त्रधारी शेजाऱ्यांमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानने याला आंतरराष्ट्रीय मानकांचे उल्लंघन व सिंधू पाणी कराराचे भंग मानले आहे. २३ एप्रिल रोजी भारताने पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या घटनेला जबाबदार धरत आयडब्ल्यूटी (इंटरनेशनल वॉटर ट्रीटी) थांबवला.

पीओकेतील मुझफ्फराबाद आणि चकोटी भागातील स्थानिक अधिकाऱ्यांनी लाउडस्पीकरवरून सायरन वाजवले आणि पाण्याच्या पातळीमध्ये वेगाने होणाऱ्या वाढीमुळे

पान २ ▶




Mahindra with you hamesha 1800-209-6006 customercare@mahindra.com | xmart by mahindra SMART BUY. SMART EXCHANGE.

ऑफर स्टॉक असेपर्यंत निवडक मॉडेल्सवर वैध आहे. ही ऑफर इतर कोणत्याही ऑफर सोबत जोडता येणार नाही. नमूद केलेली ऑफर विमा, एक्सचेंज, लॉयल्टी, कॉर्पोरेट लागू असल्यास जास्तीत जा ऑफर खरेदी केलेल्या ब्रँड आणि मॉडेलनुसार आणि शहरानुसार बदलू शकते. अचूक तपशीलासाठी तुमच्या जवळच्या महिंद्रा डीलरशी संपर्क साधा. ऑफरच्या अटी पूर्वसूचनेशिवाय बदलल्या/सुधारल्या दाखवलेल्या ॲक्सेसरीज मानक उपकरणांचा भाग नाहीत. *ऑफर 30 एप्रिल 2025 पर्यंत वैध आहे. *अटी आणि शर्ती लागू.

NAIK®

**NAIK MOTORS : Verna (South Goa) -** 8956150974, 8956931865, **Sangolda (North Goa) -**
**Ratnagiri -** 7290055258, **Chiplun -** 9112214186, **Kudal -** 9146035426, **Kankavali -** 91460354